नि.फौ.ख.क्र.३०३०१३०/२००२
सरकार वि. विश्वास
नि. क्र.२०

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ साक्षीदार**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**
**नाव : अभिमन्यु हंसाराज भुरे,**
**वय : ३८ वर्षे,**
**व्यवसाय : नोकरी–गणेशपेठ पोलीस स्टेशन, नागपूर.**
**राहणार : पोलीस लाईन टाकळी, नागपूर.**

**सरकारी पक्षातर्फे सरतपास सहायक सरकारी वकील ममता आवारीवार यांच्यामार्फत शपथेवर सुरूः**

मी सध्या गणेशपेठ पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत आहे. मी कोर्ट मोहरील म्हणुन काम पाहतो. मी सन २०२४ पासून गणेशपेठ पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वेळोवेळी न्यायालयामार्फत साक्षीदारांना समन्स बजावणीकामी वेळोवेळी समन्स मिळत होते. त्यानुसार मी समन्स वारंट बजावनी कर्मचारी नामे समिर वाघ यांना साक्षीदारांचे समन्स देत असे. आता मला नि.क्र.१८ व १९ वरील साक्षीदारांचे समन्स बजावणी अहवाल दाखवण्यात आले, सदरचे समन्स मी संबंधीत कर्मचा–याला दिले होते त्यानुसार त्यांनी साक्षदारांचा पत्ता मिळुन न आल्यामुळे त्यांना बजावणी होवु शकली नाही असे अहवाल सादर केले. सदर अहवालांवर त्यांची सही असुन मी ती ओळखतो. प्रकरण २००२ चे असल्याने नजीकच्या काळात साक्षीदारांना समन्स बजावणी होण्याची शक्यता दिसुन येत नाही.

**सरतपास पुर्ण**
**उलटतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.05.11 17:40:58 +0530

**नागपूर.**
दि. ११/०५/२०२६

**(कौस्तुभ नागेश मराठे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर
कोर्ट क्र.१